महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ ३८ /२०२४ दि.०८/०३/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**संदर्भ** :– 1) MSRDC/02/JMD(ENGG-1)/BKSP/Six Lanning/Desai Creek/F.No.204/1497, Date -01/03/2024.
2) कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे जा.क्र. १६७/२०२४, दि. ०७/०३/२०२४.

*******

**ज्याअर्थी,** कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **कोळसेवाडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीमध्ये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई अंतर्गत लोढा पलावा जंक्शन येथील देसाई खाडी ब्रिज ते काटई गाव येथे नवीन उड्डाणपूल निर्माण करण्याचे काम चालू आहे. कल्याण फाटा/शिळ फाटा कडून कल्याण कडे जाणाऱ्या वाहिनीवर देसाई खाडी ब्रिजचे बाजूस असलेल्या पिलरवर मोठया केनच्या सहाय्याने ०९ सिमेंट गर्डर ठेवण्याचे काम करण्यात येणार आहे. त्याकरीता दि. १०/०३/२०२४ ते दि. १८/०३/२०२४ रोजीपावेतो रात्रौ २३:०० ते सकाळी ०६:०० वाजेपावेतो सदर पूलावरील वाहिनी वाहतूकीकरीता बंद करण्यात येणार असल्याने, सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद** – १) मुंब्रा, कल्याण फाटा कडून कल्याण कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना **कल्याण फाटा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** – सदर वाहने कल्याण फाटा–मुंब्रा बायपास–खारेगाव टोलनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद** – २) कल्याण कडून कल्याण फाटा कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना **काटई चौक (बदलापूर चौक)** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** – सदर वाहने काटई चौक (बदलापूर चौक)–खोणी नाका–तळोजा एमआयडीसी मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना खालील नमूद कालावधी दरम्यान गर्डर टाकण्याचे काम पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

१) दि. १०/०३/२०२४ रोजी रात्रौ २३.०० वा. ते दि. ११/०३/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वाजेपर्यंत
२) दि. ११/०३/२०२४ रोजी रात्रौ २३.०० वा. ते दि. १२/०३/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वाजेपर्यंत
३) दि. १२/०३/२०२४ रोजी रात्रौ २३.०० वा. ते दि. १३/०३/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वाजेपर्यंत
४) दि. १३/०३/२०२४ रोजी रात्रौ २३.०० वा. ते दि. १४/०३/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वाजेपर्यंत
५) दि. १४/०३/२०२४ रोजी रात्रौ २३.०० वा. ते दि. १५/०३/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वाजेपर्यंत
६) दि. १५/०३/२०२४ रोजी रात्रौ २३.०० वा. ते दि. १६/०३/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वाजेपर्यंत
७) दि. १६/०३/२०२४ रोजी रात्रौ २३.०० वा. ते दि. १७/०३/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वाजेपर्यंत
८) दि. १७/०३/२०२४ रोजी रात्रौ २३.०० वा. ते दि. १८/०३/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वाजेपर्यंत
९) दि. १८/०३/२०२४ रोजी रात्रौ २३.०० वा. ते दि. १९/०३/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वाजेपर्यंत

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे, भिवंडी, कल्याण–डोंबिवली, उल्हासनगर, नवी मुंबई महानगरपालिका.

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.

मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे/कल्याण

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे.

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण,

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर.

ठाणे पोलीस पत्रक.

<u>प्रत</u> :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर.

२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे.

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>प्रत</u> :– संबंधित सहायक पोलीस आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर/संबंधित पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग, ठाणे शह

२/– म.न.पा. कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner